अनुभव व मी पाहिलेला त्या उभयतांचा बोध घेण्यासारखा नित्याचा कार्यक्रम माझ्या आठवणीप्रमाणें मी येथें देण्याचें योजिलें आहे. बापूसाहेबांच्या पूर्वींच ३–४ वर्षे सौ. आई वारल्या. त्या शिरडींतच वारल्या. बाबांची पहाटेची काकड आरती व दुपारची आरती मेघा ( साठेसाहेबांचा ब्राह्मण ) वारल्यापासून रोज नेमानें बापूसाहेबच करीत. बाबांनीं बापूसाहेबांस श्री एकनाथी भागवत वाचण्याची आज्ञा केली होती. त्याप्रमाणें ते एकनाथी भागवत नित्यनेमानें दुपारीं चार पांच वाजतां वाचीत. दुपारची आरती झाल्यावर बापूसाहेब बाबांस दररोज नैवेद्य घेऊन जात. सुरवातीला कित्येक दिवस नैवेद्य काय आणिला आहेस म्हणून बाबा त्यांना विचारीत. 'रोजचा साधाच नैवेद्य आणिला आहे' असें बापूसाहेब त्यांना सांगत. बाबा म्हणत 'शिरा करून नाहीं कां आणिलास ?' बापूसाहेब म्हणत 'नाहीं.' बाबा म्हणत 'तर मग जा करून आण.' बापूसाहेब म्हणत, 'बाबा तुम्हीं अगोदर सांगत नाहीं. आतां सांगतां. आतां बारा वाजून गेले. आतां शिरा इतक्यांत कसा तयार होणार.' बाबा म्हणत, 'बापूसाव आतां होईल. त्याला किती वेळ लागतो. जा करून आण जा.' बापूसाहेब म्हणत, 'बाबा आतां सर्वांनाच जेवणास उशीर होईल.' बाबा म्हणत 'कांहीं हरकत नाहीं. होऊं दे. पण शिरा करून आणच.' बापूसाहेब विचारीत 'शिरा किती करूं.' बाबा म्हणत 'आण शेराचा किंवा दोन २ शेराचा करून. बाबांच्या या आज्ञेप्रमाणें बापूसाहेब तितका शिरा करून आणीत. जरी सर्वांचे नैवेद्य आले असले तरी बाबा बापूसाहेबांचा शिरा येईपर्यंत थांबत. बापूसाहेबांची व सौ. आईंची कसोटी पाहाण्याकरतांच कीं काय कोण जाणें बाबा बहुतकरून दररोज याप्रमाणें शिरा करून आणण्यास सांगत. व तेही आळस किंवा अवज्ञा करीत नसत. याप्रमाणें क्रम सतत सुमारें २ वर्षे चालला. नंतर बाबांनींच एक दिवस बापूसाहेबांना सांगितलें कीं ' आतां शिरा पुष्कळ झाला. आणीत जाऊं नको.' सौ. आई ह्या नित्यनेमानें बाबांस सकाळची न्याहारी घेऊन जात. न्याहारीचे पदार्थ त्या फार आस्थेनें, प्रेमानें व भक्तीनें तयार करीत. कधीं दुधांतली बाजरीची दशमी, तर कधीं भाजणीचे थालपीठ, कधीं दुधांतली पिठीं तर कधीं

दुधांतल्या थालिपिठाचे वडे याप्रमाणें पदार्थ करीत. आंबेमोहोर तांदळाची वाटी व साजुक लोणकढी तुपाची वाटी मात्र दररोज असावयाचीच. एखादी सुंदर चटणी व एखादी बाबांच्या आवडीची भाजी ही रोज न्याहारीकरतां करीत. न्याहारीकरितां कधीं गव्हल्यांची खीर तर कधीं बेसनाचा लाडू करीत व बाबा कधीं लहर लागल्यास त्यांतील किंचित ग्रहण करीत. बापूसाहेब व सौ. आई या उभयतांस बाबांखेरीज अन्य विषय क्वचितच असे. सदा सर्व काळ बाबांचाच विषय, बाबांचाच ध्यास, बाबांच्याच गोष्टी चाललेल्या असावयाच्या. पहांटे काकड आरतीची तयारी करणें, सकाळीं न्याहारीची तयारी करणें, दुपारीं दुपारचे आरतीची, नैवेद्याची, जेवणाची व मधुकऱ्यांच्या मधुकरीची तयारी करणें, तिसरे प्रहरीं श्री एकनाथी भागवत वाचन्याकरतां तयारी करून देणें हीं कामें सौ. आईंची असत. व तीच करण्यांत त्यांचा सर्व वेळ जाई. बापूसाहेब भागवत घरींच वाचीत. बापूसाहेबांकडे बाबांचें दर्शन घेण्यासाठीं आलेल्या भक्तमंडळींपैकी रोज बहुतेक कोणीना कोणी तरी असेच. पण उभयतां दोघेंही पाहुणे भक्ताचा कंटाळा कधींच करीत नसत. उलट त्यांस प्रेमानेंच वागवीत. बापूसाहेबांस संतती नसल्याबद्दल त्या उभयतांनीं केव्हांही खिन्नता प्रगट केलेली नाहीं. तीं उभयतां मला आत्याबाई म्हणत. व मजवर फार प्रेम करीत व सदोदीत बाबांच्याच गोष्टी व अनुभव सांगत. बापूसाहेबांची व सौ. आईंची बाबांवर अत्यंत निष्ठा. त्यामुळें कोणत्याही प्रकारचें संकट आलें, अडचण आली, किंवा शारीरिक व्याधी उत्पन्न झाली कीं तीं बाबांकडे धांव घेत व ते जसें सांगतील त्या प्रमाणें करीत. एकदा सौ. आईस कांहीं भयंकर रोग झाला होता. बाबांनीं त्यांस जवळ जवळ ६।७ महिने दुधावर राहाण्यास सांगून त्यांचा रोग बरा केला.

एके दिवशीं आई सकाळीं न्याहारी घेऊन गेल्या असतांना बाबा त्यांना म्हणाले, 'आई आज तुझ्याकडे एक म्हैस येईल. तिला पुष्कळ पुरणाच्या पोळ्या त्यावर पुष्कळ तूप घालून खावयास घाल.' आई म्हणाल्या 'बाबा मी पोळ्या तयार करीन व त्यावर तूपही पुष्कळ घालीन, पण ती म्हैस मी कुठें

शोधावयास जाऊं व ती अमकीच म्हैस असें मी कशावरून ओळखूं.' बाबा म्हणाले 'आई तुला ती काळजी कशाला पाहिजे. तुझ्या पोळ्या तयार झाल्या कीं ती म्हैस तुझ्या दाराशींच येईल.' आई म्हणाल्या, 'मी ज्या वाड्यांत राहातें त्या वाड्यास दारें दोन आहेत. व पुष्कळवेळां दोन्ही दारांशीं म्हशी येतात. व त्या वाटेल तेव्हां येतात, तेव्हां आपण म्हणतां तीच म्हैस ती असें मी कशावरून समजूं?' बाबा म्हणाले 'तुझ्या पोळ्या तूप लावून तयार झाल्या कीं ज्या दाराशीं जी म्हैस येईल तीच ती म्हैस. ती मागील दाराशींच येईल.' बाबांच्या आज्ञेनुरूप आईंनीं आस्थापूर्वक सुंदर पुरणाच्या पोळ्या तयार केल्या व त्यावर यत्किंचितही कसर न करतां यथास्थित तूप घालून त्या चांगल्या चुबचुबीत केल्या. सुमारें १२ १२॥ चा सुमार झाला. आई मागील दारीं जाऊन पाहातात तों खरोखरीच एक म्हैस दाराशीं नजरेस पडली. त्यांना परमानंद झाला व बाबांच्या बोलण्याचें साश्चर्य कौतुकही वाटलें. त्यांनीं लागलीच त्या पोळ्या तिच्यापुढें आणून ठेविल्या. त्या म्हशीनें त्या सर्व पोळ्या खाल्या व लागलीच तेथल्या तेथेंच प्राण सोडला. आई घाबरल्या. त्यांचा सर्व आनंद मावळला. त्यांना पराकाष्ठेचें दुःख झालें. त्या अतीशय हळहळूं लागल्या. त्यांना ह्यांतील इंगित कांहींच कळेना. त्यांना वाटूं लागलें कीं आपल्या हातून ही निष्कारण मोठी हत्याच झाली. पोळ्यांतील कणीक, पिठी, पुरणांतील गूळ, डाळ व तूप हे सर्व पदार्थ नीट पाहून घेतलेले होते. व आपणही पोळ्या मनोभावानें केल्या होत्या. मग हें असें कसें झालें. म्हैस कां मेली. याचें पातक कोणाचे माथ्यावर. मी तर अगदीं निरपराधी आहें. मी जें केलें तें स्वतःचे मतानें केलें नाहीं. बाबांच्या आज्ञेनें केलें. असें असतां हें अरिष्ट मजवर कां कोसळावें. आतां मला लोक काय म्हणतील.ती म्हैस कोणाची? तिचे मालकास ही गोष्ट कळली म्हणजे तो म्हणेल कीं या बाईनें माझी म्हैस मारली. बाबांच्या आज्ञेवरून मी हें केलें हें त्याला काय माहीत? तो मला दोष देणारच. त्याने म्हशीची किंमत मागितल्यास किंवा सरकारदरबार केल्यास त्याचा परिणाम

काय होईल ? या व अशाच अनंत सुष्ट व दुष्ट कल्पनांनीं व विचारतरंगांनीं त्यांचे मनांत रण माजविलें. विश्वरंगभूमीवरील नटाचार्य प्रभु बाबांची अघटित करणी कोणास कळणार ? त्यांच्या आज्ञेनें केलेल्या गोष्टींचा परिणाम विपरीत झाला म्हणून त्या अपयशाचें खापर ते आपल्या भक्तांच्या माथ्यावर कधीं तरी फोडतील काय ? बाबांचा यांत काय हेतू होता तो आतां आपण त्यांसच विचारावा असें मनांत आणून आई तशाच बाबांच्याकडे धांवल्या. व झालेली सर्व हकीकत त्यांनीं बाबांच्या चरणीं निवेदन केली. बाबा म्हणाले ' आई भिऊं नकोस. झालें त्यांत वावगें कांहींच झालें नाही. तें असेंच व्हावयाचें होतें. अग त्या म्हशीची तेवढीच वासना राहिली होती. व ती तिची तृप्त झाल्याबरोबर ती त्या योनींतून सुटली. आतां तिला चांगला जन्म येणार आहे. जा तूं आपले घरीं. तुला वाईट वाटण्याचें कांहीं कारण नाहीं. उगीच खेद करूं नको. तूं तिला म्हशीच्या योनींतून सोडवलीस यांत तिचें तूं वाईट काय केलेंस ? ' याप्रमाणें बाबांच्या मुखांतील बोल श्रवण केल्यावर आई आनंदानें घरीं आल्या. काय ही सर्वज्ञता !

एकवेळीं असें झालें कीं बापूसाहेबांच्या वडिलांची श्राद्धतिथि आली. बापूसाहेब कोंकणस्थ. शिरडी गांवांत सर्व ब्राह्मण माध्यंदिन शाखेचे. बापूसाहेबांना. नेहमींच श्राद्धपक्षाकरतां कोपरगांवाहून त्यांच्या शाखेचे ब्राह्मण आणावे लागत. पहांटेची काकड आरती, दुपारची पूजा व आरती व चावडीचे दिवशीं रात्रीची पूजा व आरती हीं नित्याचीं कामें बापूसाहेबांकडे असत. तेव्हां त्यांना केव्हांही व कोणत्याही कामाकरतां शिरडी सोडून जातां येत नसे. व जावेंच लागलें तर ते बाबांची आज्ञा घेऊन जात. वडलांची श्राद्धतिथि जवळ आली. मी कोपरगांव किंवा दुसऱ्या इतर गांवीं जाऊन ब्राह्मणांची सोय पाहातों. व त्यांना आमंत्रणें देऊन येतों. करतां मला एक दिवस बाहेरगांवीं जाण्याची आपण परवानगी द्या असें बापूसाहेब बाबांना म्हणाले. बाबा म्हणाले, ' बापूसाब अजून श्राद्धास किती दिवसांचा अवकाश आहे व तूं किती ब्राह्मण सांगतोस ? बापूसाहेब म्हणाले बाबा अजून ८ दिवसांचा

अवकाश आहे. व मी प्रतिवर्षी दोनच ब्राह्मण सांगतों. बाबा म्हणाले बरें आहे. उद्यां पाहूं. बापूसाहेबांनीं एकदोन दिवसांनीं पुन्हां ती गोष्ट बाबांच्या-कडे काढिली व पुनः परवानगी मागितली. त्याही वेळीं बाबा म्हणाले, 'पाहूं आणखी एक दोन दिवसांनीं.' बापूसाहेबांनीं आणखी एक दोन दिवस वाट पाहिली. व पुन्हां बाबांना परवानगी विचारली. बाबा म्हणाले 'अजून दे पाहूं पुढें.' बापूसाहेब तापट व चंचल मनाचे. ते म्हणाले, बाबा मी आतां वाट किती दिवस पाहूं. आपण मला सोडीत नाहीं. मग श्राद्ध करूं नको कीं काय?' बाबा म्हणाले 'बापूसाब अजून श्राद्धास चार दिवसांचा अवकाश आहे. त्या करतां आजपासून ब्राह्मण पाहून ठेवून काय करावयाचें आहे. पाहातां येईल पुढें.' दोन तीन दिवसांनीं बाबांचें हें बोलणें बापूसाहेबांस पटेना. व बाबा असें कां सांगतात तेंही कळेना. बाबांवर श्रद्धा तर पूर्ण. पण बाबा हें असें काय करतात. जाण्याला परवानगी कां देत नाहींत. श्राद्ध करूं नकोस असेंही सांगत नाहींत. व जाऊंही देत नाहींत. परक्या गांवाहून ब्राह्मण आणावयाचे. त्यांना अगोदर पासून आमंत्रण न दिल्यास ते आयते वेळीं कसे येतील? त्यांनीं दुसरीकडे आमंत्रणें घेतलीं किंवा त्यांना इतर कांहीं अडचणी आल्या तर काय करणार? असे अनंत तरंग बापूसाहेबांचे मनांत येऊं लागले. श्राद्ध जवळ आलें, अजून ब्राह्मणांस आमंत्रणें दिलीं नाहींत. घरांत श्राद्धाची कांहीं तयारी केलेली नाहीं. तरी या वर्षी मामंजींचें श्राद्ध करावयाचें आहे कीं नाहीं वगैरे प्रश्न आईही बापूसा-हेबांस विचारूं लागल्या. झालेली सर्व हकीकत बापूसाहेबांनीं कुटुंबास सांगि-तली. त्यांनाही हें कोडें उकलेना. त्याही म्हणूं लागल्या कीं, परवांवर श्राद्ध आलें आज किंवा उद्यां तरी पुनः एकवार बाबांना विचारावें व कोपरगांवास जाऊन यावें. बापूसाहेब म्हणाले बरें-- पुनःएकवार उद्यां विचारतों. तुमची घरांत श्राद्धाची तयारी मात्र असूं द्या. खरेंच निमिषार्धांत अनंत कोटी ब्रह्मांडे निर्माण करणाऱ्या साई परमात्म्यास बापूसाहेबांच्या वडिलांच्या श्राद्धाकरितां लागणाऱ्या दोन ब्राह्मणांची काळजी कसली? कोणाही ब्राह्मणाच्या मनांत

प्रेरणा करण्यास त्यांना काय अशक्य ? परंतु संतसंगती कितीही झाली तरी त्यांच्या सर्वसत्ताधारित्वाबद्दल एकदम खात्री पटावी कशी ? किती झालें तरी आपण अज्ञानी जीव. त्यांच्या दिव्य ज्ञानापुढें आपली बुद्धिमत्ता ती किती ? असो. बापूसाहेबांनीं आवले दिवशीं पुनः एकवार विनंती केली व बाबांची परवानगी मागितली. बाबा म्हणाले, 'आपल्याला कोठें जावयास नको. ब्राह्मणच उद्यां येथें येतील. बापूसाहेब म्हणाले ' बाबा हें काय ? माझ्या घरीं श्राद्ध आहे असें त्यांना स्वप्न का पडणार आहे ? शिवाय उद्यां ब्राह्मण आले व ते माझ्या शाखेचे नसले म्हणजे आयत्या वेळेस माझ्या शाखेचे ब्राह्मण कोठून आणू ?' बाबा म्हणाले ' तुला जसे पाहिजे तसेच मिळतील. बापूसाहेबांस तें खरेंच वाटेना. ते म्हणत बाबा येथें उत्सव नाहीं, पर्वणी नाहीं विशिष्ट तिथीही नाहीं. असें असतां माझे शाखेचे ब्राह्मण कोण येणार ? बाबा म्हणाले ' जा येतील कोणी तरी.' बापूसाहेब निरुत्तर झाले. त्यांनीं हें सर्व वर्तमान कुटुंबाला सांगितलें. त्या म्हणाल्या, बरें आहे बाबांची मर्जी आपण आपली श्राद्धाची तयारी करून ठेऊं म्हणजे झालें. खरोखरच परब्रह्माच्या मुखांतून निघालेलीं अक्षरें असत्य कशीं होतील ? एका कविवर्यानें म्हटलेलें मला आठवतें.

**लौकिकानां हि साधूनामर्थं वागनुधावति ।**
**ऋषीणां पुनराद्यानां वाचमर्थोऽनुधावति ॥**

लौकिकी साधूंच्या मुखांतून जे शब्द निघतात ते पुढें होणाऱ्या गोष्टीचा रागरंग पाहून निघत असतात, परंतु संतवर्यांच्या मुखांतून जे शब्द निघतात ते सत्य करण्यासाठीं त्यांच्या मागें अर्थ धांवत असतो. असो. मला संस्कृत येत नाहीं. पण पाठांत असलेला श्लोक व स्मरणांत असलेला अर्थ वर दिला आहे. खरें खोटें वाचक पाहून घेतील.

मौजेची गोष्ट ही कीं खरोखरच दुसरे दिवशीं सकाळीं पुणतांब्याचे दोन उत्तम विद्वान श्राद्ध चालविणारे कोंकणस्थ ब्राह्मण बाबांचे दर्शनास आले. त्यांनीं बाबांचे चरण वंदन करून बाबांनाच विचारलें, 'महाराज येथें

भोजनाची सोय कोठें होईल ?' बाबा म्हणाले, 'जा त्या बापूसाहेबांच्या घरीं. ब्राह्मण शोध करीत बापूसाहेबांच्या बिऱ्हाडीं आले व विचारूं लागलें कीं बाबांनीं आम्हांस आज आपलेकडे भोजनास यावयास सांगितलें आहे. आम्ही पुणतांब्याचे कोंकणस्थ ब्राह्मण. आम्ही आतांच त्यांचें दर्शन घेऊन आलों. बापूसाहेबांस व आईस परमाश्चर्य वाटलें व परमानंद झाला. ते म्हणाले 'पण तुम्हांस श्राद्ध चालवतां येतें काय ?' ब्राह्मण म्हणाले 'होय. आमची भिक्षुक व याज्ञिकीवृत्तीच आहे.' अहाहा कोणा सद्भक्ताला अशा गुरुमाउलीच्या सर्वज्ञतेबद्दल साभिमान कौतुक वाटणार नाहीं ! बापूसाहेब व आई यांना श्राद्ध व्हावें ही उत्कट इच्छा. मग गुरुराय त्यांच्या सदिच्छेच्या आड कसे येतील. कोपरगांवास जाऊन ब्राह्मण शोधून आणण्याचा खर्च व खटपट वाचवून आपल्या मनाजोगें आपल्या शाखेचे विद्वान ब्राह्मण श्राद्ध तिथीचे दिवशीं आपल्या घरीं आणून देण्याची तजवीज करणारे सद्गुरु कोठें मिळणार ! त्यांना बाबांच्या निकट सान्निध्यांत बहुतकाल राहून त्यांच्या वर प्रमाणें असंख्य लीलानुभवाचा प्रतिदिनीं आस्वाद चाखावयास मिळाला ते बापूसाहेब धन्य व त्यांचें पतिपरायण कुटुंब आई त्याही धन्य.

बापुसाहेबांना १०० रुपये पेन्शन मिळत असे व प्रथम प्रथम ते दरमहा ५० रु. बाबांना देत व बाकीचे आपल्या खर्चासाठीं ठेवीत. पुढें पुढें महिन्याचीं बिलें चुकवून जी शिल्लक राहील ती सर्व ते बाबांना देत असत. जरी त्यांना मूलबाळ नव्हतें तरी, दररोजचा शेर दोन शेराचा शिरा, चारपांच मधुकरी पाहुणे व वारकरी असल्यामुळें त्यांच्या खर्चाची नेहमींच ओढाताण होत असे. त्यामुळें त्यांस लोकांचें थोडें फार देणेंही होई. व केव्हां ते घरांतील चीजवस्त गहाण ठेवूनही नित्याच्या खर्चाकरितां पैसे काढीत. परंतु कुटुंबाखेरीज त्यांचे मागें मुलाबाळांचा अगर आप्तइष्टांचा कांहीं व्याप नसल्यामुळें प्रपंचाबद्दल त्यांस फारशी फिकीर वाटत नसे. बाबा त्यांचे जवळ फार करून कधीं दक्षणाही मागत नसत. व कदाचित मागितलीच तर बापूसाहेब त्यांच्या नेहमींच्या तापट स्वभावाप्रमाणें सडेतोड उत्तर देत कीं, 'बाबा आपल्यास माहीत आहे कीं मजजवळ दिडकी नाहीं. मग आपण

दक्षणा कसली मागतां व ती मी देऊं कोठून ! ' बाबा शांतपणानें म्हणत 'अरे बापूसाब दक्षणा देऊं नका. पण रागावतां कां ?' याप्रमाणें उभयतांची भाषा होऊन बापूसाहेब परत जात.

बापूसाहेब नोकरीवर असतांना त्यांनीं एका गृहस्थास १४०० रुपये व्याजीं दिले त्यास १२-१४ वर्षें झाली, सौ. आईंचा व त्या गृहस्थाचा त्यांच्या माहेरकडून कांहीं नात्याचा संबंध होता. तो गृहस्थ त्यावेळीं फार अडचणींत होता व बापूसाहेबांसही त्यावेळीं पैसे देण्याची सवड होती, म्हणून आईचे आग्रहावरून बापूसाहेबांनीं त्यांस रक्कम दिली. तो गृहस्थ औरंगाबादकडचा राहाणारा. त्याची परिस्थिती बिघडल्यामुळें त्याचेकडून कित्येक वर्षांत दिडकी वसूल येईना. मागणीं फक्त पत्रोपत्रीं करावयाची. दोन चार वेळां बापूसाहेब त्याच्याकडे जाऊन आले. परंतु त्यांच्या जाण्याचा कांहीं एक उपयोग न होतां त्यांना हात हलवीत परत यावें लागलें व जाण्या येण्याचा खर्च मात्र अंगावर पडला. पण त्यावेळीं ते नोकरीवर होते व २०० रु. त्यांस पगार मिळत असे. त्यामुळें या खर्चाचें त्यांस विशेष वाटत नसे. परंतु बाबांचे जवळ राहिल्या पासून थोडया पैशांत प्रपंच भागविण्याची पाळी आल्यापासून त्यांना त्या गृहस्थाकडे जाण्यास दोन अडचणी येऊं लागल्या. एक खर्चाची व दुसरी बाबांच्या परवानगीची. खर्चाच्या अडचणीपेक्षां बाबांच्या परवानगीचीच त्यांना जास्त अडचण भासे. केव्हां ही परवानगी विचारावयास गेले म्हणजे बाबा म्हणत, 'आतांच जावयाचें काय अडलें आहे ? पाहायला येईल मग याचा विचार. वेळोवेळीं खर्चाची अडचण झाली कीं बापूसाहेब बाबांकडे औरंगाबादेकडे जाण्याची परवानगी विचारीत व बाबा त्यांना वरप्रमाणेंच जबाब देत, असें कित्येक वर्षें चाललें. बापूसाहेब विचारून विचारून कंटाळले. बाबा परवानगी देत नाहींत असें पाहून कित्येक वेळां बापूसाहेब एकेरीवरही येत व म्हणत कीं 'बाबा आपण परवानगी देत नाहीं तर मी आपले २-३ हजार रुपये बुडवूं कीं काय ? संभाळा आपली पूजा व आरती. उद्यांपासून मी ती करणार नाहीं व तसाच निघून चालता होईन

पैशांवाचून मी येथें काय करूं ?' बाबा म्हणत ' अरे आपले पैसे कोठें जातात ? ते घरबसल्या येतील. तूं इतकी उतावळ कां करतोस ?' बापूसाहेब लागलीच डोक्यांत राख घालीत व म्हणत कीं, 'बाबा मी आपलें ऐकणार नाहीं. तो गृहस्थ येथें कसला येतो ? मी स्वतः त्याचेकडे ३—४ वेळां खर्च करून गेलों तरी तो कवडी देत नाहीं. त्याच्यावर फिर्याद लावल्यावांचून तो पैसे देणार नाहीं. करतां मला जाऊं द्या. 'बाबा म्हणत 'बरें सध्यां राहूं द्या, पुढें पाहूं. ह्याप्रमाणें बाबा बोलले म्हणजे बापूसाहेब निराश होऊन बिऱ्हाडीं परत जात. तथापि कितीही निराशा झाली तरी बाबांवर उभयतांची ही निष्ठा अढळ यांत मात्र बिल्कूल शंका नाहीं. मनुष्यस्वभावच असा आहे कीं त्याची कोणाही विभूतीवर कितीही श्रद्धा असली तरी श्रद्धा फलद्रूप होण्यास जी विलक्षण सबूरी लागते ती त्याचे ठिकाणीं फारच अल्प असते. त्यामुळें संतवाक्याबद्दल याची वृत्ती कांहीं वेळ साशंक होते. बाबांची तरी मजा अशीच असे, तेहीः फार वेळ भक्तांची सबूरी चांगलीच कसोटीस लावीत. व त्यामुळें भक्तांचे मुखावर साहजिकच निराशेची छटा झळके. असो. बाबा आपल्याला जाण्यास परवानगी देत नाहींत असें पाहून बापूसाहेब दिवसेंदिवस या पैशाबद्दल जास्त जास्तच निराश होऊन त्यांनीं जवळ जवळ तो नाद सोडूनही दिला. व आतां या बाबतींत पुनः विचारावयाचें नाहीं असें त्यांनीं मनांत ठरवून ते स्वस्थ बसले. परंतु चमत्कार हा कीं, गतप्राण झालेल्या शरीरांत जसें एकदम चैतन्य येऊन त्यानें उठून बसावें त्याचप्रमाणें तिलांजली सोडलेल्या पैशाचें कूळ लवकरच पुढें एके दिवशीं २—३ मंडळीसह शिरडीस बापूसाहेबांचे बिऱ्हाडीं आलें. त्यांना पाहून बाबांच्या अघटित घटनेबद्दल साश्चर्य कौतुक तर वाटलें; परंतु त्यांची बाबांवरची श्रद्धाही अतिशय दुणावली; औरंगाबादेचें देणेदार कूळ आम्हीं सावकार येथें असतां केवळ बाबांच्या दर्शनाकरतां खात्रीनेंच आलें नाहीं. पण त्याच्या येण्यानें कांहीं लभ्यांश होतो कीं नाहीं या विचारांत बापूसाहेब पडले. आपण १३—१४ वर्षांत बापूसाहेबांस व्याजाची किंवा मुदलाची एक दिडकीही दिली नाहीं तेव्हां बापूसाहेब

आतां तापतील असें त्यांस वाटूं लागलें. शेवटीं त्या गृहस्थानीं भीत भीत सौ. आईजवळ गोष्ट काढिली कीं मी फक्त १४०० रुपये मुद्दल आणिलें आहे. मला व्याज देण्यास ऐपत नाहीं. तरी कृपा करून याचा स्वीकार करून मला कर्जमुक्त करा. आई म्हणाल्या बापूसाहेब या म्हणण्यास रुकार देणार नाहींत. ते अगोदरच तापट; त्यांत तुम्हीं माझ्याकडील नात्याचे. माझ्या भिडेमुळें तुम्हांस रक्कम दिली व १४ वर्षांनीं ती उसनवार घ्यावयाची. इतक्या गोष्टींचा मेळ बसावा कसा ? तथापि मी बापूसाहेबांस विचारून तुम्हांस सांगतें. आईनीं ही गोष्ट बापूसाहेबांस कळविली बापूसाहेब या गोष्टीस मुळींच कबूल होईनात. शेवटीं बाबा सांगतील तितके रुपये घ्यावे असें उभयतांचें ठरून बापूसाहेब बाबांस विचारावयास गेले व त्यांनीं सर्व हकीकत बाबांस निवेदन केली. बाबा म्हणाले आपण फक्त १४०० रुपयेच त्याच्याकडून घ्यावे. जास्त मागूंच नयेत. मग बापूसाहेब काय करतात ? त्यांनीं १४०० रुपये घेतलें व त्या कुळास कर्जमुक्त केलें. खरेंच बाबानीं सांगितलें तें योग्यच सांगितलें. जें झालें-तें "सर्व नाशे समुत्पन्ने अर्धं त्यजति पंडितः" या न्यायानेंच झालें. खरें पाहिलें तर हे १४०० रु. बाबानींच बापूसाहेबांस दिले; नाहीं तर ते येण्याची आशाच कोठें होती ? मग बाबा म्हणाले बापूसाहेब हे सर्व पैसे माझे आहेत. बापूसाहेबांनीं सर्व रुपये बाबांचे पुढें ठेविले. बाबांनीं त्यांतील कांहीं रुपये ठेवून बाकीचे बापूसाहेबांस परत दिले. बापूसाहेबांस, आईस व त्या कुळास या गुरुमातेच्या लीलेचा अत्यानंद झाला.

ज्या गुरुराजाच्या कृपेनें अनुभव लिहिण्याची स्फूर्ति झाली त्याच गुरुराज चंद्रशेखर चरणांबुजावर तेंच तीन अनुभवरूपी त्रिदल वाक्-बिल्व पत्र अनन्यभक्तीनें आज महाशिवरात्रीचे दिवशीं अर्पण करून आपली रजा घेतें.

आपली नम्र भगिनी,
पार्वतीबाई ओझरकर उर्फ
आऊताई देव.

मु. भाजे,
ता. मावळ,
जि. पुणें.
२-३-१९२७.

# श्रीसाईदेवाधनम्ः

सप्रेम सा. न. वि. वि. खालील नम्र विनंती पुनः एकवार आपलें श्रीसाईलीलेचे एखादे अंकीं प्रसिद्ध करावी.

श्रीसाईलीलेंत पूर्वी बाबांचा कायम फंड कोणकोणत्या मार्गांनीं जमवितां येईल याबद्दल सुचलेले मार्ग प्रेमीभक्त वाचकांपुढें ठेविले. त्यापैकीं एक किंवा जास्त ज्यांस जो किंवा जे रुचतील किंवा ज्याचे किंवा ज्यांचे त्यांना फारसा त्रास न घेतांही सहज अवलंबन करतां येण्यासारखे आहे अशा पैकीं एक मार्ग खरोखरच अती सोपा दिसतो. असा माझा स्वतःचा अनुभव आहे. व त्याचें अवलंवन गरिबापासून श्रीमंतापर्यंत सर्व स्थितीच्या भक्तांस करतां येणें शक्य आहे. विशेषेंकरून गरीब व मध्यम स्थितीचे भक्तांस हा फारच श्रेयस्कर आहे. इच्छा व जागृति मात्र पाहिजे. पूर्वी सुचविल्याप्रमाणें मी आपले घरीं एक लहानशी बाबांचे नांवाची पेटी करून ठेविली आहे. प्रत्येक महिन्यांत कांहीं ना कांहीं तरी तीथ, पर्वणी हव्यकव्य सणवार असतोच. घरांतील सर्व स्त्रियांनी व मुलांनी त्या त्या वेळीं जशा त्या किंवा तीं इतर देवापुढें दिडकी दोन दिडक्या ठेवतात त्या प्रमाणें बाबांच्या पुढेंही ठेवाव्या. या प्रमाणें केल्यास महिन्याचे कांहीं पेटींत सहज एक रुपयावर दिडक्या सांचतात. प्रत्येक वेळीं व प्रत्येक कामांत घरांतील सर्व माणसांना बाबांचें पुण्यस्मरण होतें. ते आपल्या सर्वांच्या डोळ्यापुढें दिसतात. ते आपल्याजवळ आहेत व ते आपली प्रत्येक गोष्ट पहात असतात, अशी भावना होत जाते व पेटींत द्रव्यनिधी सांचतो.

आपण आपल्या देवाची पूजा रोज करतों. किंवा कांहीं श्रीमंतांचे घरीं पूजेस ब्राह्मण असतात. कांहीं कांहीं मंडळीची अशी पद्धत आहे कीं, ते

दररोज पूजेंत देवापुढें एक दिडकी ठेवतात. ह्याप्रमाणें बाबांच्या भक्तांनीं याप्रमाणें रोज बाबांची पूजा करतांना त्यांचेपुढें एक किंवा ऐपतीप्रमाणें २ अथवा जास्त दिडक्या नित्याची दक्षणा ठेविली तर बाबा ह्यात असत, आपणाजवळ दक्षणा मागत व ती आपण त्यांना आनंदानें देत असूं तिचें ही पुण्यस्मरण कायम राहील व बाबांचा निधीही सांचेल. बाबा दक्षिणा कां मागत व ती देणें किती इष्ट व श्रेयस्कर होतें याबद्दल मी स्वतंत्र रीतीनें पुढें लिहिणार आहें. त्या वेळीं बाबांच्या दक्षिणा मागण्याच्या सत्य व भक्तवात्सल्य हेतूची पूर्ण कल्पना येईल.

असो. माझ्या पेटींत या प्रमाणें कमींत कमी दरमहा २ रुपयावर पैसे जमतात. रा. रा. लक्ष्मण माधव ऊर्फ बन्याबापू भिडे हे एक दिवस माझेकडे आले व आपल्यास दरमहा जी प्राप्ति होते त्या प्राप्तींतील प्रत्येक रुपयांत एक दिडकी बाबांचे नांवाची काढावयाची असा त्यांनीं आज वर्ष दीड वर्ष विचार केला; परंतु ह्या दिडक्या संसारांतच खर्च होतात ह्यास काय युक्ती करावी म्हणून ते मला विचारूं लागले. तेव्हां मी त्यांस सांगितलें कीं, महिन्यांस १०० किंवा दीडशेंची प्राप्ती असल्यास महिना अखेर एकदम १–९–० किंवा २–५–६ रक्कम ठेवण्यास जड जातें. आठवण रहात नाहीं. पुढच्या महिन्यांत दुप्पट देऊं असा विचार मनांत येतो. रक्कम फुगत जाते व शेवटीं तिचे पर्यवसान न देण्यांत होतें. त्यापेक्षां महिन्याचे प्रारंभीं जी रक्कम हातांत येईल त्यापैकीं संकल्पाप्रमाणें १–९–० किंवा २–५–६ बाबांचे पेटींत टाकावे व नंतर दुसरे कार्याचे खर्चास लागावें. त्यांना ही व वरील दोन्ही युक्त्या पसंत पडल्या आहेत. व श्री साईलीलेच्या प्रत्येक वर्गणीदार व इतर भक्तांनीं याप्रमाणें केल्यास वर्षाअखेर ७०० वर्गणीदार भक्तांच्या ह्या दिसण्यांत अल्प दिसणाऱ्या रकमेचा खात्रीनें ८ ते १० हजारापर्यंत निधि जाईल.

साईशान्न परायणं परतरं, देवस्य दासोस्म्यहम् ।
साईशेऽस्तु मनोरतिर्ममसदा, हे नाथ मां मोचय ॥

अर्थः—संतश्रेष्ठ साईंचा अखंड जयजयकार आहे. ( अशा ) साइराजांचें मी भजन करतों. साईप्रभूंनीं सर्व विकारसमूह जिंकिला आहे ( अशा ) या साईबाबांस माझा साष्टांग नमस्कार असो. साईविभूवांचून ( या विश्वांत ) मला अन्य श्रेष्ठ दैवत व अन्य श्रेष्ठ आश्रय नाहीं. ( अशा ) साईदेवाचा मी किंकर आहे. साई ईशाचें ठिकाणीं सदा सर्वकाळ माझे मनाचें प्रेम ( आवड व भक्ति ) असो. हे साईनाथ मला मुक्त करा.

ठाणें ३–३–२७. **बाबांचें बाळ.**

व बाबांचा संकल्पित एक लक्षाचा निधी अवघ्या १० वर्षांत अनायासें सहज सांचेल.

हा मार्ग म्हणजे " आधी केलें व मग सांगितलें " या श्री दास-बोधांतील श्रीसद्गुरुसमर्थोक्तीप्रमाणें आहे. वरील अंकांत दुसरे जे निरनिराळे मार्ग सुचविले आहेत तेही उपयोगांत आणावेतच. पण ह्याचें आचरण नित्य करून ते करावेत. म्हणजे " क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे " हा दोष येणार नाहीं.

अपरिचित अशा एका बाबांच्या भक्तानें वरील अंकांत सुचविलेले मार्ग वाचून त्याप्रमाणें त्यानें श्री साईलीलेच्या वार्षिक वर्गणी खेरीज दोन महिन्याचे दोन रुपये आपल्यास रस्त्यांत दिल्याचें मला आठवतें, तरी ते गृहस्थ कोण, कोठील वगैरे माहिती आपण कृपेनें प्रसिद्ध करावी.

त्याचप्रमाणें आजपर्यंत आपल्याकडे ज्या ज्या भक्तांनीं, श्रीसाईलीलेच्या वाचकांनीं अथवा इतर मंडळींनी श्री साईलीलेला सुरवात झाल्यापासून व त्याचे पूर्वी ज्या ज्या लहान मोठ्या रकमा किरकोळ, किरकोळसुद्धां आज-पर्यंत पाठविल्या असतील त्या सर्व श्री साईलीलेच्या प्रत्येक अंकास त्या करतां एक निराळें पृष्ठ मुद्दाम राखून ठेऊन त्यांत प्रसिद्ध करण्याची कृपा करावी. म्हणजे आजपर्यंत कोणाकडून किती रक्कम आली, कायम निधी झाला किती, होणें राहिला आहे. किती व कोण कोणत्या उपायांनीं तो जमविण्याचा प्रयत्न होत आहे वगैरे सविस्तर हकीकत सर्वांस कळेल.

शार्दूलविक्रीडितम्.

साई साधुमणिः सदैव जयते, श्रीसाईराजं भजे ।
साईशेन जितं विकारनिचयं, बाबाय तस्मै नमः ।

श्रीगजानन

श्रीसाई प्रसन्न.

दादर मुंबई

सप्रेम सा. न. वि. वि. ता. १६।१।२७

श्रीसाईबाबांचे मला आलेले अनुभव साईलीलेच्या अंकांत प्रसिद्ध करावे असें मनांत आल्यावरून लिहिण्यास सुरवात केली आहे; तरी सवडी-प्रमाणें ते प्रसिद्ध करावे अशी नम्र विनंती आहे.

इ. स. १९११ मध्यें मी प्रथम श्रीसाईबाबांचें नांव माझे एका मित्राचे मार्फत ऐकिलें व एके दिवशीं शिरडीस जाण्याचें मनांत आलें; परंतु पैशाची अडचण म्हणून सहज मी रात्रीं जेवण झाल्यावर शेजारचे एका मित्राजवळ गोष्ट काढली. त्यानें तावडतोब रुपये १० मला दिले. मनाला फार आनंद झाला व श्रीसाईमहाराजांचे प्रथम दर्शनास तावडतोब त्याच दिवशीं रात्रीचे गाडीनें निघालों. श्रीसाईबाबांनी मला पदरांत घेतलें तें आजमितीपर्यंत कायम आहे. या गेल्या १५।१६ वर्षांत त्यांनीं माझे व माझे कुटुंबांतील सर्वत्रांचें मातापिता म्हणून संरक्षण केलें व करीत आहेत. या वरील काळांत वेळोवेळीं आलेले प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष अनुभव मी पुढें आपले-कडे पाठविणार आहे. गेल्या जुलै महिन्यांचे १ तारखेपासून श्रीसाईबाबांचे प्रेरणेनें मी घरांत १ पेटी ठेविली आहे व त्यांत रोज निदान १ पैसा तरी श्रीसाईबाबाप्रीत्यर्थ टाकावा असा नियम ठरविला आहे वगैरे मजकूर आपणांस प्रत्यक्ष सांगून पूर्वी आपलेकडे त्या पेटींत जमलेले रुपये ५ जमाही केले आहेत. या पेटींत विशेष कार्यप्रसंगीं जास्त पैसे टाकण्याचा प्रघात ठेविला आहे. तरी माझी प्रत्येक श्री साईभक्तास अशी नम्र विनंती आहे कीं, त्यानेंहि अशाच दुसऱ्या कोणत्या तरी मार्गानें श्रीसाईबाबांचें संस्थानास मदत करावी.

माझे घरांतील पेटींत आज जमलेले रुपये ५ यासोबत पाठवीत आहें. कळावें, हे विनंति.

श्रीसाईबाबांचा सेवक,

**नरहर दिनकर फाटक.**

# अध्याय ४४ वा.

श्रीगणेशाय नमः । श्रीसरस्वत्यै नमः । श्रीगुरुभ्यो नमः ।

श्रीकुलदेवतायै नमः । श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ।

॥ श्रीसद्गुरुसाईनाथाय नमः ॥

ॐनमो श्रीसाई चिद्घन । सकल सौख्याचें आयतन ॥
सकळ संपदाचें निधान । दैन्यनिरसन यत्कृपा ॥ १ ॥

करितां अवलीला चरण वंदन । समस्त पापां होय क्षालन ॥
मग जो भावें भजन पूजन । करी तो त्याहूनही धन्य ॥ २ ॥

पाहतां जयाचें सस्मित मुख । विसरे समस्त संसारदुःख ॥
ठायींच विरे तहान भूक । ऐसें अलौकिक दर्शन ॥ ३ ॥

‘ अल्ला मालीक ’ जया ध्यान । जो निष्काम निरभिमान ॥
निर्लोभ निर्वासन जयाचें मन । तयाचें महिमान काय वानूं ॥ ४ ॥

अपकाऱ्यांही जो उपकारी । ऐसी शांती जयाचें पदरीं ॥
तया न विसंबे कोणीहि क्षणभरी । द्यावा निजांतरीं निवास ॥ ५ ॥

रामकृष्ण राजीवाक्ष । संतहीनाक्ष वा एकाक्ष ॥
देवरूपें सुंदर सुरूप । आनंदस्वरूप संत सदा ॥ ६ ॥

देवांचे नेत्र श्रवणांत । संत दृष्टीस नाहीं अंत ॥
‘येयथामां’ देव वदत । संत द्रवत निरकांहीं ॥ ७ ॥

राम कृष्ण आणि साई । तिघांमाजी अंतर नाहीं ॥
नामे तीन वस्तू पाही । ठायींचे ठायीं एकरूप ॥ ८ ॥

तिये वस्तूस मरणावस्था । वार्ताहीतो समूळ मिथ्या ॥
काळावरही जयाची सत्ता । तया का व्यथा त्या होतीं ॥ ९ ॥

प्रारब्ध संचित न कळे आपणां । नेणों मी त्या क्रियमाणा ॥
करुणाकर साई गुरुराणा । जाणोनि करुणा भाकितसें ॥ १० ॥

वासनेच्या लाटा नाना । तेणे उसंत नाहीं मना ॥
कृपा तुझी असलियाविना । स्थैर्य येईना जीवास ॥ ११ ॥

गताध्यायारंभींवचन । दिधलें परी न झालें पालन ॥
घडलें न सांग निरूपण । साद्यंत संपूर्ण परिसावें ॥ १२ ॥

अंतकाल समीप जाणून । ब्राह्मण मुखें रामायण श्रवण ॥
केलें चतुर्दश रात्रंदिन । बाबांनी अनुसंधानपूर्वक ॥ १३ ॥

ऐसे दोन सप्ताह भरतां । रामायण श्रवण करितां ॥
विजयादशमी दिवस येतां । बाबा विदेहता पावले ॥ १४ ॥

गताध्यायीं जाहलें कथन । होतां बाबांचें प्राणोत्क्रमण ॥
लक्ष्मणमामानीं[1] केलें पूजन । जोगांनीं[2] नीरांजन आरती ॥ १५ ॥

तेथून पुढें छत्तीस तास । हिंदु आणि मुसलमानांस ॥
लागले विचार करावयास । कैसीया कलेवरास सद्गती ॥ १६ ॥

कैसें समाधिस्थान नियोजन । कैसी अकल्पित इष्टिका पतन[3] ॥
कैसा एकदां ब्रह्मांडीं प्राण । चढविला तीन दिन बाबांहीं ॥ १७ ॥

समाधि कीं देहावसान । सकळ झालें संशयापन्न ॥
पाहूनि श्वासोच्छ्वासावरोधन । अशक्य उत्थान वाटलें ॥ १८ ॥

ऐसे तीन दिवस जातां । प्राणोत्क्रमणचिवाटलें निश्चितता ॥
मग उत्तर विधीची[4] वार्ता । सहजचि समस्तां उदेली ॥ १९ ॥

---

१ या नांवाचे ग्रामजोशी व श्रीसाईबाबांचे एक भक्त. २ कै. बा. सखाराम हरी जोग ३ वीट पडणें. ४ समाधिविसर्जन.

ऐसियाही तया अवसरीं । परम सावध बाबा अंतरीं ॥
येऊनि अवचित निजदेहावरी । घालविली दुरी जनचिंता ॥ २० ॥
इत्यादि सकल कथा । प्रेमभावें परिसिजे श्रोतां ॥
श्रवणीं आनंद होईल चित्ता । कंठ गहिंवरता दाटेल ॥ २१ ॥
कथा नव्हे ही एक संदूक[1] । गर्भीं साई रत्न अमोलिक ॥
उघडून पहा प्रेमपूर्वक । अनुभवा सुख दर्शनाचें ॥ २२ ॥
या अवघिया अध्यायाआंत । खचिला दिसेल साईनाथ ॥
श्रवणें पुरतील मनोरथ ॥ स्मरणें सनाथ होईजे ॥ २३ ॥
परम उदार जयाचें आचरित ॥ तया साईचें हें चरित ॥
करावया श्रवण व्हा उद्यत । अव्यग्र चित्त सप्रेम ॥ २४ ॥
ऐसी पावन कथा ऐकतां । धणी नपुरे भक्तचित्ता ॥
पूर्ण दाटे परमानंदता । संसार श्रांता विश्राम ॥ २५ ॥
चित्त प्रसन्नतेचा हरिख । निजानंद ठाके सन्मुख ॥
सर्व सुखाचें सोलीव सुख । तें हें कथानक साईचें ॥ २६ ॥
कितीहि ऐका नित्य नूतन । रमणीयतेचें[2] हेंचि लक्षण ॥
म्हणोनि ही संतकथा पावन । होऊनि अनन्य परिवासी ॥ २७ ॥
असो पुढें कलेवर सद्गती । याच वादाची भवती नभवती ॥
करितां करितां समस्थ थकती । पहा प्रचीती अखेर ॥ २८ ॥
बुद्धीचें वाड्याचें दालन । त्यांतील गाभाऱ्याचें प्रयोजन ॥
होणार होतें मुरलीधर स्थापन । ठरलें तें स्थान बाबांचें ॥ २९ ॥
आरंभीं जैं पाया खोदिला । जात असतां बाबा लेंडीला ॥
माधवरावांच्या विनवणीला । माथा डोलविला बाबांनीं ॥ ३० ॥
माधवराव करीत विनंती । नारळ देऊनि बाबांचे हातीं ॥
मुरलीधराचा गाभारा खोदिती । अवलोका म्हणती कृपेनें ॥ ३१ ॥

---

१ पेटी. २ प्रतिक्षणं यन्नवता मुपैति, तदेव रूपं रमणीयतायाः॥

पाहूनियां ती शुभवेळ । बाबा म्हणाले फोडा हा नारळ ॥
आपण समस्त बाळगोपाळ । येथेंच काळ क्रमूं कीं ॥ ३२ ॥

येथेंच आपण बसतां उठतां । सुखादुःखाच्या करूं वार्ता ॥
येथेंच पोरांसोरां समस्तां । चित्तस्वस्थता लाधेल ॥ ३३ ॥

बाबा कांहीं तरी हें बदले । ऐसेंच आरंभीं सर्वांस दिसलें ॥
पुढें जेव्हां अनुभवा आलें । कळून चुकले ते बोल ॥ ३४ ॥
होतां बाबांचें देहावसान । राहिलें मुरलीधराचें स्थापन ॥
हेंच वाटलें उत्तम स्थान । साईनिधान रक्षावया ॥ ३५ ॥

'वाडियांत पडो हें शरीर' । अंतीं बाबांचे जे उद्गार ॥
तोच शेवटीं ठरला विचार । जाहले मुरलीधर बाबाच ॥ ३६ ॥

श्रीमंत बुट्टी आदीकरून । हिंदूमुसलमान सर्वत्र जन ॥
याच विचारा राजी होऊन । वाडा सत्कारणीं लागला ॥ ३७ ॥

ऐसा बहुमोल वाडा असून । बाबांचा देह कुठेंही पडून ॥
जाता, मग तो वाडाही शून्य । अत्यंत भयाण भासता ॥ ३८ ॥

आज तेथें जें भजनपूजन । कथा कीर्तन पुराण श्रवण ॥
अतीथ अभ्यागतां अन्नदान । होतें, त्या कारण श्रीसाई ॥ ३९ ॥

आज तेथें जें अन्नसंतर्पण । लघुरुद्रमहारुद्रावर्तन ।
देशोदेशींचे येती जन । त्या सर्वा कारण श्रीसाई ॥ ४० ॥

असो ऐसी हे संताची वाणी । अक्षरें अक्षर सांठवा श्रवणीं ॥
कांहीं तरी तें बोलती म्हणुनी । नावमानूनि त्यागावी ॥ ४१ ॥

आरंभीं ती कितीही मुग्ध । अथवा दिसो कितीही संदिग्ध ॥
काळें होतो अर्थावबोध । जरी ती दुर्बोध आरंभीं ॥ ४२ ॥

असतां देहपातास अवधी । पुढील होणारे गोष्टी संबंधीं ॥
दुश्चिन्हें घडलीं कांहीं आधीं । मशिदी मधीं शिरडींत ॥ ४३ ॥

तयांमाजील एकचि आतां । निवेदितों मी श्रोतयां करितां ॥
कीं तीं सकळ सांगूं जातां । ग्रंथ विस्तारता पावेल ॥ ४४ ॥

किति एक बहुतां वर्षांपासूनी । होती एक बाबांची जुनी ॥
वीट, जियेवरी ते हात टेंकुनी । आसन लावूनि बैसत ॥ ४५ ॥

विटेचा त्या आधार घेउनी । नित्य एकांतीं होतां रजनी ॥
बाबा मशीदींत स्वस्थ मनीं । आसन लावूनि बैसत ॥ ४६ ॥

ऐसा कित्येक वर्षांचा क्रम । निर्वेध चालला होता अविश्रम ॥
परी होणारासि न चले नियम । घडतसे अतिक्रम अकल्पित ॥ ४७ ॥

बाबा नसतां मशिदींत । पोरगा एक होता झाडीत ॥
तळींचा केर काढावयाचें निमित्त । वीट ती किंचित उचलली ॥ ४८ ॥

फुटावयाची वेळ आली । वीट पोराचे हातून निसटली ॥
धाडकिनी ती खालीं पडली । दुखंड झाली तात्काळ ॥ ४९ ॥

ऐकतां हें बाबांनीं म्हटलें । वीट नाहीं कीं कर्मचि फुटलें ॥
ऐसें वदून अति हळहळले । नेत्रीं आले दुःखाश्रू ॥ ५० ॥

नित्य योगासन ज्या विटे । घालीत बाबा ती जंव फुटे ॥
तेणें दुखें हृदय फाटे । कंठ दाटे तयांचा ॥ ५१ ॥

ऐसी बहूताकाळाची जुनाट । निजासनाचें मूळपीठ ॥
अवचट भंगली पाहूनि वीट । मशीद सुनाट वाटे त्यां ॥ ५२ ॥

वीटची पण ती प्राणापरती । बाबांची होती अति आवडती ॥
पाहूनि तियेची ऐसी ती स्थिति । बाबा अति चित्तीं हळहळले ॥ ५३ ॥

त्याच विटेसी टेंकूनि कोपर । बाबा घालवित प्रहराचे प्रहर ॥
घालून आसन योग तत्पर । म्हणून विजवर प्रेम मोठें ॥ ५४ ॥

जयें संगें आत्मचिंतन । जी मज होती जीव कीं प्राण ॥
ती भंगली माझी सांगातीण । मीही तिजवीण न राहें ॥ ५५ ॥

वीट जन्माची सांगातीण । गेली कीं आज मज सांडून ॥
ऐसे तियेचे गुण आठवून । बाबांनीं रुदन मांडिलें ॥ ५६ ॥
येथें सहजीं येईल आशंका । वीटही क्षणभंगुर नाहीं का ।
एतदर्थ करावें कां शोका । काय लोकांनीं म्हणावें ॥ ५७ ॥
आशंकाही प्रथम दर्शनीं । उठेल कवणाच्याही मनीं ॥
परवतें मी समाधानी । पाय नमुनी साईचे ॥ ५८ ॥
कैसा होईल जगदुद्धार । कैसे तरतील दीन पामर ॥
एतदर्थचि संतांचा अवतार । कर्तव्य इतर नाहीं त्या ॥ ५९ ॥
हास्य रुदन क्रीडा प्रकार । लौकिक नाट्यचि येथील सार ॥
जैसा जैसा श्रेष्ठाचार । लोकव्यवहारही तैसा ॥ ६९ ॥
संत जरी पूर्ण ज्ञानी । अवाप्तसकलसंकल्प जनीं ॥
तरी लोक तरावया लागुनी । कर्माचरणीं उद्युक्त ॥ ६० ॥
असो हें देहावसान व्हावया आधीं । बत्तीस वर्षापूर्वीच समाधी ॥
होणार परी म्हाळसापतीची बुद्धी । निवारी त्रिशुद्धि हा कुयोग ॥६२॥
टळता न जरी हा दुष्टयोग । कैंचा अदृष्यातें साईसुयोग ॥
त्रेचाळीस वर्षामागेंच वियोग । होता कीं कुयोग ऐसा तो ॥ ६३ ॥
मार्गशीर्ष शुद्ध पौर्णिमा । बाबा अस्वस्थ उठला दमा ॥
सहन करावया देहधर्मा । ब्रह्मांडीं आत्मा चढविला ॥ ६४ ॥
आतां येथून तीन दिन । आम्हीं चढवितों ब्रम्हांडीं प्राण ॥
प्रबोधूं नका अम्हा लागून ॥ बाबांनीं सांगून ठेविलें ॥ ६५ ॥
पहा तो सभामंडप कोण । बाबांनीं बोटें दाविलें ठिकाण ॥
म्हणाले तेथें समाधी खोदून । द्या मज ठेवून त्या जागीं ॥ ६६ ॥
स्वयें म्हाळसापतीस लक्षून । बाबा तदावदती निक्षून ॥
नका मज सांडूं उपेक्षून । दिवस तीन पर्यंत ॥ ६७ ॥

· १ कोंपरा

तयेस्थानीं निशाणीं खोन । लावूनि ठेवा निदर्शक खूण ॥
ऐसें वदतां वदतां प्राण । ठेविला चढवून ब्रम्हांडीं ॥ ६८ ॥

भरावी एकाएकीं भवंडी । तेवी निचेष्टित देहदांडी ॥
म्हाळसापतीनें दिधली मांडी । आशा ती सांडिली इतरांनीं ॥ ६९ ॥

रात्रीचा समय झाले दहा । तेव्हांचा हा प्रकार पहा ।
स्तब्ध झाले जन अहाहा । काय अवचित हा प्रसंग ॥ ७० ॥

नाहीं श्वास नाहीं नाडी । वाटे प्राणें सांडिली कुडी ॥
जनास भयंकर अवस्था गाढी । सुख निखडी साईस ॥ ७१ ॥

मग पुढें म्हाळसापती । अहो रात्र सावधवृत्ती ॥
साईबाबालागीं जपती । तेथेंच बैसती जागता ॥ ७२ ॥

जरी होती साईमुखींची । आज्ञा समाधी खोदावयाची ॥
तरी तें तैसें करावयाची । हिंमत कवणाची चालेना ॥ ७३ ॥

पाहोनि बाबा समाधिस्थ । मिळाला तेथें गांव समस्त ॥
जन विस्मित पाहतो ताटस्थ । कादीना भगत मांडीतें ॥ ७४ ॥

प्राण गेला कळतां देखा । बसेल एकाएकीं धक्का ॥
सांगून तीन दिवस मज राखा । झकविलें लोकां साईनें ॥ ७५ ॥

श्वासोच्छ्वास जाहला बंद । ताटस्थ्य पावलीं इंद्रियें सबंध॥
नाहीं चलन वलनाचा गंध । तेजही मंद जाहलें ॥ ७६ ॥

हरपलें बाह्यव्यवहारभान । वाचेसि पडलें दृढ मौन ॥
कैसे शुद्धीवर मागुतेन । चिंताही गहन सर्वत्रां ॥ ७७ ॥

वृत्तीवरी येईना शरीर । काळ क्रमिला दोन दिवसांवर ॥
आले मौलवी मुल्लाफकीर । मांडिला विचार पुढील ॥ ७८ ॥

अप्पा कुळकर्णी काशीराम । आले केला विचार ठाम ॥
बाबांनीं गांठिलें निज सुखधाम । द्यावा कीं विश्राम देहासीं ॥ ७९ ॥

कोणी म्हणती थांबा क्षणभरी । घाई इतुकी नाहीं बरी ॥
बाबा नव्हेत इतरांपरी । अमोघ वैखरी बाबाची ॥ ८० ॥

तात्काळ प्रत्युत्तर करावें इतरीं । थंडगार पडल्या शरीरीं ॥
येईल कोठून चैतन्य तरी । कैसे अविचारी सकळ हे ॥ ८१ ॥

खोदा कबर दाविल्यास्थळीं । बोलवा कीं सकळ मंडळी ॥
द्या मूठमाती वेळच्यावेळीं । तयारी सगळी करा कीं ॥ ८२ ॥

ऐसी भवती न भवती होतां । पूर्ण झाली दिनत्रयवत्ता ॥
पुढें पहाटे तीन वाजतां । चेतना येतां आढळली ॥ ८३ ॥

हळू हळू दृष्टी विकसितां । आळेपिळे शरीरा देतां ॥
श्वासोच्छ्वास चालू होतां । पोटही हालतां देखिलें ॥ ८४ ॥

दिसूं लागलें प्रसन्न वदन । होऊं लागलें नेत्रोन्मीलन ॥
जाऊनियां निचेष्टितपण । प्रबोध लक्षण उमटलें ॥ ८५ ॥

जणुं विसरले देहभावा । तयाचा पुनश्च आठव व्हावा ॥
चुकला ठेवा ठायीं पडावा । भांडार उघडावा ती गत ॥ ८६ ॥

देखोनि साईसावधान । जाहले सकळ प्रसन्नवदन ॥
टळलें देवदयेनें विघ्न । आश्चर्य निमग्न भक्तजन ॥ ८७ ॥

भगत पाही मुख कौतुकें । साईही मान हळूच तुके ॥
मौलवी फकीर पडले फिके । कीं प्रसंग चुके भयंकर ॥ ८८ ॥

पाहूनि मौलवीची दुराग्रहता । भगत आज्ञापालनीं चुकता ॥
यत्किंचितही निश्चया ढळता । वेळ तो येता कठीण तैं ॥ ८९ ॥

त्रेचाळीस वर्षां आधींच कबर । होऊनि जाती कैंची मग खबर ॥
कैंचें मग तें दर्शन मनोहर । होतें सुखकर साईचें ॥ ९० ॥

लोकोपकार हेंचि कारण । करूनि समाधीचें विसर्जन ॥
साई पावते झाले उत्थान । समाधान भक्तजनां ॥ ९१ ॥

भक्तकार्यार्थ जो भागला । परमानंदीं रूप लागला ॥
कैसा आधीं जाई प्रबोधिला । अकळ लीला तयाची ॥ ९२ ॥

देखूनि बाबा सावधान । सुखावले भक्तजन ॥
जो तो धांवे घ्यावया दर्शन । पुनरुज्जीवन सुखातें ॥ ९३ ॥

असो पूर्वील कथानुसंधान । तें अखेरचें देहावसान ॥
जाहलें जयाचें संपूर्ण कथन । यथा स्मरण आजवरी ॥ ९४ ॥

म्हणोनि आपण श्रोतां सकळिक । मनीं विचारा कीं क्षण एक ॥
कासया वहावा हर्षशोक । दोनीही अविवेक मूलक ॥ ९५ ॥

औट हाताचा स्थूळगाडा । देहेंद्रियांचा जो सांगाडा ॥
तो काय अपुला साईनिधडा । समूळ सोडा हा भ्रम ॥ ९६ ॥

साई म्हणावे जरी देहा । तरी त्यांनाहि नाहीं विदेहा ॥
रूपहि नाहीं वस्तूसि पहा । रूपातीत श्रीसाई ॥ ९७ ॥

देह तरी नाशिवंत । वस्तु स्वतंत्र नाशरहित ॥
देह पंचभूतांतर्गत । अनाद्यनंत निजवस्तू ॥ ९८ ॥

त्यांतील शुद्ध सत्वात्मक । ब्रह्मरूप चैतन्य देख ॥
जड इंद्रिया जो चालक । साई नामक ती वस्तु ॥ ९९ ॥

ती तो आहे इंद्रियातीत । इंद्रियें जड तीतें नेणत ॥
तीच इंद्रियां प्रवर्तवीत । चाळवीत प्राणांतें ॥ १०० ॥

त्या शक्तीचें नाम साई । तिजवीण रिता ठाव नाहीं ॥
तिजवीण ओस दिशा दाही । भरली पाही चराचरीं ॥ १०१ ॥

तीच कीं ही अवतार स्थिति । तीच होती आधीं अव्यक्तीं ॥
नामरूपीं आली व्यक्तीं । समरसली अव्यक्तीं कार्यातीं ॥ १०२ ॥

अवतारकृत्य संपवूनी । अवतारीही देहत्यजूनी ॥
जैसे प्रवेशती निर्विकल्पभुवनीं । तैसीच ही करणी साईची ॥ १०३ ॥

गुरु व्हावें येतां मनीं । जैसे स्वामी गाणगा भुवनीं ॥
पर्वत यात्रेस जातों म्हणुनी । गेले निघूनी एकाकी ॥ १०४ ॥
भक्तांनीं धरितां अडवून । तयांचें केलें समाधान ॥
लोकाचारीं हें माझें गमन । गाणगाभुवन सोडींना ॥ १०५ ॥
कृष्णातीरीं प्रातःस्नान । विंदुक्षेत्रीं अनुष्ठान ॥
मठांत करावें पादुका पूजन । तेथेंच निरंतर वास माझा ॥ १०६ ॥
तैसीच साईबाबांची परी । निधन केवळ लोकचारीं ॥
पाहूं जातां आहेत स्थिरचरीं । सर्वांअंतरीं श्रीसाई ॥ १०७ ॥
जैसी जयाची भजनस्थिती । तयास तैसी नित्य प्रचीती* ॥
संदेह कांहीं न धरावा चित्तीं । मरणातीत श्रीसाई ॥ १०८ ॥
साई भरला स्थिरचरीं । साई सर्वांच्या आंतबाहेरी ॥
साई तुम्हा आम्हां भीतरी । निरंतरीं नांदतसे ॥ १०९॥
साई समर्थ दीन दयाळ । भावार्थी भक्त प्रणतपाळ ॥
परमप्रेमाचे ते भुकाळ । अति स्नेहाळ सकळिकां ॥ ११० ॥
जरी चर्मचक्षूसीं न दिसती । तरी ते तों सर्वत्र असती ॥
स्वयें जरी सूक्ष्मत्वीं लपती । तरीही लाविती वेड अम्हां ॥ १११ ॥

---

१ श्री. नृसिंह सरस्वति

*एकदां श्री साईबाबांचे एक भक्त रा. मोरेश्वरराव सावे यांची बाबांच्या भंडाऱ्याला शिरडीस जाण्याची फार उत्कंठा होती. पण दोन दिवस आधीं ते एकाएकीं आजारी पडले, व त्यांचें मुंबईहून तेथें जाणें होऊं शकलें नाहीं. त्यामुळें त्यांना अतिशय वाईट वाटलें व त्यांचें मन फारच उद्विग्न झालें व रात्री झोंपही येईना. पण भंडाऱ्याचे दिवशीं पहाटेस त्यांचा डोळा लागला. तितक्यांत महाराजांनीं त्यांस स्वप्नांत दर्शन दिलें व दक्षिणा मागून घेतली. जागे झाल्याबरोबर वृत्तींत एकदम फरक पडला व तळमळ पार जाऊन समाधान वाटूं लागलें. महाराजांनीं देह सोडला आहे तरी आपल्या भक्तांची तळमळ कोणत्यातरी तऱ्हेनें तें शमवितात.

त्यांचें निधन केवळ ढोंग । आम्हां फसविण्या आणिलें सोंग ॥
नटनाटकी ते अव्यंग । भंगोनि अभंग जाहले ॥ ११२ ॥

त्याचिया ठायीं जो अनुराग । तेणें करूनि पाठलाग ॥
अंतीं लावूं तयाचा माग । कार्यभाग साधूं कीं ॥ ११३ ॥

मनोभावें पूजा करितां । भक्तीभावें तयां आठवितां ॥
अनुभव येईल सकळ भक्तां । सर्वव्यापकता दिसेल ॥ ११४ ॥

उत्पत्ति, स्थिति आणि लय । चित्स्वरूपायांचें न भय ॥
तें सदासर्वदा चिन्मय । विकारां आश्रय ना तेथें ॥ ११५ ॥

जैसें सुवर्ण सुवर्णपणें । राही अलंकाराही विणें ॥
केली नानापरींचीं आभरणें । तरी न सोनेपण त्यागी ॥ ११६ ॥

परोपरीचे अलंकार । हे तो सर्व विनाशी विकार ॥
आटितां उरे हेम अविकार । नासे आकार नामही ॥ ११७ ॥

तरी या हेमीं हा हेमाडपंत । विरोनि जावो समूळ नितांत ॥
एवंगुण साई पदांकित । आपलयांत वास करो ॥ ११८ ॥

पुढें केला तेरावा दिन । बाळासाहेबभक्त रत्न ॥
मिळवूनियां ग्रामस्थ ब्राह्मण । उत्तर विधान आरंभिलें ॥ ११९ ॥

करूनियांसचैलस्नान । बाळासाहेब हस्तें जाण ॥
करविली तीलांजुली तिलतर्पण । पिंडप्रदानही केलें ॥ १२० ॥

सपिंडी आदिक उत्तरक्रिया । शास्त्राधारें त्या त्या समया ॥
जाहल्या मासिकासह अवघिया । धर्मन्यायाप्रमाणें ॥ १२१ ॥

भक्तश्रेष्ठ उपासनींनीं । जोगांसमवेत जाउनी ॥
भागीरथीच्या पवित्र स्थानीं । होमहवनीय संपादिलें ॥ १२२ ॥

ब्रह्मभोजन अन्नसंतर्पण । यथासांग दक्षिणाप्रदान ॥
करूनिसशास्त्र विधिविधान । आले ते परतोन माघारी ॥ १२३ ॥

नाहीं बाबांना संवाद । आतां जरी हा ऐसा भेद ॥
परी दृष्टी पडतां ही मशीद । गत सुखानुवाद आठवती ॥ १२४ ॥

बाबांची नित्य आसनस्थिती । ध्यावया तियेची सुखानुभूती ॥
उत्तमोत्तम आलेख्यमूर्ती । मशीदी स्थापिलीसे प्रीती ॥ १२५ ॥

जाहली साई देहनिवृत्ति । प्रतिमादर्शनें होय अनुवृत्ति ॥
वाटे निजभक्त भावार्थी । पुनरावृत्तीच ही मूर्त ॥ १२६ ॥

शामराव उपनामें जयकर । तयांनीं ही रेखिली सुंदर ॥
ऐसी ही प्रतिमा मनोहर । स्मरण निरंतर देतसे ॥ १२७ ॥

जैसे हे प्रसिद्ध चित्रकार । तैसेच बाबांचे भक्तही थोर ॥
बाबांचिया आज्ञेनुसार । वर्तती विचारपूर्वक ॥ १२८ ॥

यांचियाही हस्तेंकरून । सुंदर छायाचित्रें घडवून ॥
करविलीं भक्तभवनीं स्थापन । धरावया ध्यानधारणा ॥ १२९ ॥

संतांस नाहीं कधींही मरण । पूर्वीं अनेकदां याचें विवरण ॥
झालेंच आहे असेल स्मरण । न लगे स्पष्टीकरण आणीक ॥ १३० ॥

बाबा न आज देहधारी । तरी जो तयांचें स्मरण करी ॥
तया ते अजूनही हितकारी । पूर्वील परी सदेहसे ॥ १३१ ॥

कोणास कांहीं बोलून गेले । परी न कांहीं अनुभवा आलें ॥
जरी तें देहावसानही झालें । म्हणून तें राहिलें न मनावें ॥ १३२ ॥

बोल बाबांचे ब्रह्मलिखित । विश्वास धरूनि पहावी प्रचित ॥
अनुभव आला जरी न त्वरित । येणार तो निश्चित कालांतरें ॥१३३॥

असो या जोगांचें नांव येतां । कथेंत आठवली आडकथा ॥
ऐका तियेची ही अपूर्वता । दिसेल प्रेमळता साईची ॥ १३४ ॥

जरी असे हा त्रोटक संवाद । गुरुभक्तांसी अति बोधप्रद ॥
सभाग्य ती ज्या वैराग्यबोध । अभागी बद्ध संसारी ॥ १३५ ॥

एकदां जोग बाबांस पुसती । अजून ही माझी काय स्थिती ॥
विचित्र माझी कर्मगति । पावेन सुस्थिती केव्हां मी ॥ १३६ ॥

बहुत वर्षें अनन्य सेवा । घडली अपुली मजला देवा
तरी या चंचल चित्ता विसांवा । अजूनि नमावा हें काय ॥ १३७ ॥

ऐसा कैसा मी दुर्भागी । हीच का माझी संतसंगीं ॥
सत्संगाचा परिणाम अंगीं । कवणिया प्रसंगीं भोगीन कीं ॥ १३८ ॥

परिसूनिहि भक्ताची विनति । साईसमर्थ परम प्रीती ॥
जोगांस काय प्रत्युत्तर देती । स्वस्थ चित्तीं परिसावें ॥ १३९ ॥

दुष्कर्माची होईल होळी । पुण्यपापाची राखरांगोळी ॥
पाहीन तुझिया कांखेस झोळी । तैं तुज भाग्यशाली मानीन ॥ १४० ॥

उपाधीचा होईल त्याग । नित्य भगवद्भक्तीचा लाग ॥
तुटतील आशापाश सांग । तैं मी तुज सभाग्य मानीन ॥ १४१ ॥

विषयासक्ति मानूनि त्याज्य । मी तूं पण सर्वथा अयोग्य ॥
जिव्हाउपस्थ जिंकी हो योग्य । तैं मीं तुज सभाग्य मानीन ॥ १४२ ॥

असो यावर कांहीं काळें । बोल बाबांचें अन्वर्थ झाले ॥
सद्गुरुकृपें जोगांस आलें । वैराग्य जें वदले बाबा तें ॥ १४३ ॥

नाहीं पुत्रसंतती पाश । कलत्र लाविलें सद्गतीस ॥
देहत्यागा आधीं संन्यास । झालें कीं वैराग्य सहजची ॥ १४४

असो हे जोगही भाग्यवान । सत्य झालें साई वचन ॥
अंतीं होऊनि संन्याससंपन्न । ब्रह्मीं विलीन जाहले ॥ १४५ ॥

जैसी जैसी साईनीं कथिली । तैसीच परिणामी स्थिती झाली ॥
उक्ति साईची सार्थ झाली । भाग्यशाली जोग खरे ॥ १४६ ॥

तात्पर्य बाबा दीनदयाळ । भक्तकल्याणालागीं कनवाळ ॥
अर्पीत बोधामृताचा सुकाळ । शिर्डींत त्रिकाळ तो परिसा ॥ १४७ ॥

जयां माझी आवड मोठी । तयांचे मी अखंड दृष्टी ॥
तयां मजवीण ओस सृष्टी । माझियाच गोष्टी तया मुखीं ॥१४८॥

तयां माझें अखंड ध्यान । जिव्हेसि माझेंच नामावर्तन ॥
करूं जातां गमनागमन । चरित्र गायन माझें तया ॥ १४९ ॥

ऐसें होतां मदाकार । कर्माकर्मीं पडेल विसर ॥
जेथें हा मत्सेवेचा आदर । तिष्ठें मी निरंतर तेथेंची ॥ १५० ॥

मज होऊनि अनन्य शरण । जया माझें अखंड स्मरण ॥
तयाचें मजमाथा ऋण । फेडीन उद्धरण करूनियां ॥ १५१ ॥

आधीं मज न दिधल्यावांचून । करितां भोजन रसप्राशन ॥
जया माझें हें निदिध्यासन । तया आधीन मी वर्तें ॥ १५२ ॥

माझीच जया भूकतहान । दुजें न ज्यातें मजसमान ॥
तयाचेंच मज नित्य ध्यान । तया आधीन मी वर्तें ॥ १५३ ॥

पितामाता गणगोत । आप्तइष्ट कांतासुत ॥
यांपासाव जो परावृत्त । तोचि कीं अनुरक्तमत्पदीं ॥ १५४ ॥

वर्षाकाळीं नानासरिता । महापूर समुद्रा मिळतां ॥
विसरती सरितापणाची वार्ता । महासागरता पावती ॥ १५५ ॥

रूप गेलें नाम गेलें । जळही जाऊनि सागरीं मिसळलें ॥
सरितासागर लग्न लागलें । द्वैत हारपलें एकत्वीं ॥ १५६ ॥

पावोनि ऐसी समरसता । चित्त विसरलें नामरूपता ॥
तें मजसि पाहील निजस्वभावता । नाहीं मजपरता ठाव तया ॥१५७॥

परीस नव्हे मी दगड । ऐसें जना करावया उघड ॥
पुस्तकपंडितीं करोनी बडबड । लोहाचे अगड आणिले ॥ १५८ ॥

तयीं मजवरी करितां घाव । उलट प्रकटतां सुवर्णभाव ॥
माझें दगडपण जाहलें वाव । अनुभव नवलाव दाटला ॥ १५९ ॥

विना अभिमान अणुप्रमाण । मज हृदयस्था यावें शरण ॥
होईल अविद्या तात्काळ निरसन । श्रवण कारण संपेल ॥ १६० ॥
अविद्या प्रसवे देहबुद्धी । देहबुद्धीस्तव आधिव्याधि ॥
हीच कीं खोटी विधि निषेधीं । आत्मसिद्धी विघातक ॥ १६१ ॥
म्हणाल आतां मी आहें कोठें । आतां मी तुम्हां कैसा भेटें ॥
तरी मी तुमचिहृदयींच तिष्ठें । विनाकष्टें सन्निकट ॥ १६२ ॥
म्हणाल-हृदस्थ कैसा कोण । कैसें काय त्याचें लक्षण ॥
ऐसी काय तयाची खूण । जेणें त्या आपण जाणावें ॥ १६३ ॥
तरी व्हावें दत्तावधान । परिसा तयाचें स्पष्ट व्याख्यान ॥
जयालागीं जाणें शरण । तोहृदयस्थ कोण हें आतां ॥ १६४ ॥
नानानामें नानारूपें । सृष्टीमाजी भरली अमूपें ॥
जयांची कवणा न करवती मापें । मायेचीं स्वरूपें तीं अवघीं ॥१६५॥
तैसाच सत्वरज तमगुण । तया त्रिगुणा ओलांडून ॥
सत्तेचें जें स्फुरेस्फुरण । तें रूप जाण हृदयस्थाचें ॥ १६६ ॥
नामरूप विरहितपण । उर्वरित जें तुझें तूंपण ॥
तेंच हृदयस्थाचें लक्षण । जाणूनि शरण त्या जावें ॥ १६७ ॥
मीच तो तूं ऐसें पाहतां । हीच दृष्टी पुढें विस्तारतां ॥
भूत मात्रीं ये निजगुरुता । ठाव न रिता मजविना ॥ १६८ ॥
ऐसा अभ्यास करितां करितां । अनुभवा येईल माझी व्यापकता ॥
मग तूं मजसीं पावूनि समरसता । पूर्ण अनन्यता भोगिसील ॥१६९॥
चित्स्वरूपीं अनुसंधान । लाधेल होशील शुद्धांतःकरण ॥
घडेल हें तुज गंगास्नान । गंगाजीवन नातळतां ॥ १७० ॥
प्रकृतिकर्माचा अभिमान । जेणें पावे दृढबंधन ॥
तया शिलगूं न देती सज्ञान । अंतरीं सावधान सदैव ॥ १७१ ॥
स्वस्वरुपीं मांडून ठाण । चळे न तेथून अणुप्रमाण ॥
तया समाधीवा उत्थान । नाहीं प्रयोजन उभयांचें ॥ १७२ ॥